।। विद्या सर्वस्य भूषणम ।।

PRABODHAN EDUCATION SOCIETY'S

Vidya Prabodhini College of Commerce, Education, Computer & Management

Vidyanagar, Alto-Parvari, Goa

**SEMESTER END EXAMINATION – April 2017 (Regular/Repeat)**

**Sub**: Marathi Paper : Elective **Semester**: II (F.Y.B.A.B.Ed.)

मराठी नाटक, वाक्याचे प्रकार, शब्दसिध्दी व नोकरीसाठी आवेदनपर पत्रलेखन

**M. Marks**: 80 **M. Time**: 2 hours

**************************************************************************************************

सूचना : १. सर्व प्रश्न सोडविणे बंधनकारक आहे.

२. उजव्या हाताकडील अंक प्रश्नाचे गुण दर्शवितात.

३. प्रत्येक नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानावर सुरू करावे.

**************************************************************************************************

**प्रश्न क्रमांक एक ः खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** (सहापैकी कोणतेही चार) (गुण १६ प्रत्येकी चार गुण)

१. 'अशी पाखरे येती' या नाटकातील अरूणचे विवाहासंबधीचे विचार काय आहेत ?

२. अरूणला दुसऱ्याची मुलं का आवडतात ?

३. अरूण डी. डब्लू. पराडकरांच्या घरात का घुसला ?

४. बंडा अरूणकडे संशयाने का बघतो ?

५. नाटक म्हणजे काय? नाटक या वाङ्मय प्रकाराचे स्वरूप स्पष्ट करा.

६. मराठी नाटकाचा ऐतिहासिक परामर्ष घ्या.

**प्रश्न क्रमांक दोन ः खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** (सहापैकी कोणतेही चार) (गुण १६ प्रत्येकी चार गुण)

१. अरूण अण्णाना आपली ओळख कशी पटवून देतो?

२. अण्णाना सरूबाबत काळजी का वाटत होती?

३. बंडाचा स्वभाव कसा होता ?

४. पाहुण्यांच्या समोर सरू नटायला का तयार नव्हती?

५. अरूण सरूला कशाची जाणीव करून देतो ?

६. अरूणने सरूबरोबर लग्नास नकार का दिला.

**प्रश्न क्रमांक तीन ः संदर्भासह स्पष्टीकरण द्या.** (चारापैकी कोणतेही दोन) (गुण १२ प्रत्येकी ६ गुण)

१. "तुम्ही थापाडे आहात, तुम्ही खोटे बोलता".

२. "नमस्कार म्हणलं, खुप दिवसांनी भेट झाली आपाली"

३. "आई! आठवतो ना अण्णाचा राग"

४. "अरे! एवढी स्थळ पाहतोय, एका ठिकाणी पसंत पडेल तर रामाचं नाव."

**प्रश्न क्रमांक चार ः सविस्तर उत्तरे लिहा.** (चारापैकी कोणतेही दोन) (गुण १२ प्रत्येकी ६ गुण)

१. सरूने लग्नास नकार का दिला ?

२. सरूला बघायला आलेला विश्वास किर्तने परत का आला ?

३. सरूचे व्यक्तिचित्र रेखाटा ?

४. सरूच्या आईचे व्यक्तिचित्र रेखाटा ?

**प्रश्न क्रमांक पाच ः सविस्तर उत्तरे लिहा.** (चारापैकी कोणतेही दोन) (गुण १२ प्रत्येकी ६ गुण)

१. 'साष्टांग नमस्कार' या नाटकातील रावबहादुर यांची व्यक्तिरेखा रेखाटा.

२. 'साष्टांग नमस्कार' या नाटकातील भद्रायुची व्यक्तिरेखा रेखाटा.

३. 'चाकोरी' या नाटकाची मध्यवर्ती कल्पना सांगा.

४. 'चाकारी' या नाटकातील तिन्ही व्यक्ती पर्णशिखी वनाकडे का जायला निघाले होते?

**प्रश्न क्रमांक सहा ः**

अ. केवल वाक्य म्हणजे काय ? सांगूण केवल वाक्याची कोणतीही दोन उदाहरणे द्या. (गुण ०३)

ब. तत्सम आणि तद्भव शब्द म्हणजे काय? सांगुण त्यांची प्रत्येकी दोन उदाहरणे द्या. (गुण ०३)

क. भारतमाता विद्यालयामध्ये मराठी विषय शिक्षकाच्या पदभरतीसाठी जाहिरात आलेली आहे त्या पदासाठी शाळेच्या मुख्याध्यापकांच्या नावे अर्ज करा.

(गुण ०६)